**<u>वादी सा.क्र.१ मंगेश नारायण धुरी यांचा उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ५ तर्फे विधीज्ञ श्री.एम.एस.काळे यांचे मार्फत शपथेवर सुरु .</u>**

०७. मला दावा मिळकतीचे वर्णन माहिती आहे. दावा मिळकतीचा सर्वे नं. ३१६/६अ असा आहे. क्षेत्र एकूण १४३ गुंठे इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती बाबत एकुण दोन हक्कसोडपत्र झालेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यापैकी पहिले हक्कसोडपत्र दि.१४/०८/२०१४ रोजी झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर हक्कसोड पत्राद्वारे प्रतिवादी क्र.४ सुनंदा राजाराम शिंदे व प्रतिवादी क्र.५ स्मिता शंकर कावले यांनी आपला हक्क प्रतिवादी क्र.१ नारायण श्रीपत धुरी, प्रतिवादी क्र.२ अंकुश श्रीपत धुरी, प्रतिवादी क्र.३अ सुगंधा चंद्रकांत धुरी यांच्या हक्कात सोडला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर हक्कसोडपत्र झाले त्या दिवशी मी दुय्यम निबंधक कार्यालय येथे हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर हक्कसोडपत्राच्या दस्त गोषवारा –२ वर साक्षीदार म्हणून मी सही केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.१४/०८/२०१४ रोजीच्या हक्कसोडपत्रान्वये फेरफार क्र.२५७८३ मंजूर झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर हक्कसोडपत्र मी आव्हानित केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या वाटपावेळी प्रतिवादी क्र.४ व ५ यांचा हिस्सा प्रतिवादी क्र.१, २, ३अ यांच्या हिश्यास देण्यास माझी काही हरकत नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, दुसरे हक्कसोडपत्र दि.१७/१२/२०२० रोजी झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर हक्कसोडपत्राद्वारे प्रतिवादी क्र.१ नारायण श्रीपत धुरी यांनी त्यांचा हिस्सा प्रतिवादी क्र.२ अंकुश श्रीपत धुरी व प्रतिवादी क्र.३अ सुगंधा चंद्रकांत धुरी यांच्या हक्कात सोडून दिला आहे. दावा दाखल करण्या पुर्वी हक्कसोडपत्राच्या दस्ताबाबत माहिती घेवून तो दस्त वाचून पाहिला होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.१७/१२/२०२० रोजीच्या हक्कसोडपत्रान्वये जामसंडे फेरफार क्र.२८२८१ मंजूर झाला आहे. आता मला माझ्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्र, नि.क्र.२४ दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासाच्या

प्रतिज्ञापत्रामधील परिच्छेद क्र.५ मधील मजकूर ' प्रतिवादी क्र.४ व ५ ची कोणतीही तक्रार राहू नये म्हणून त्यांना पक्षकार केले आहे', 'सर्वे नं.३२१ हिस्सा नं.१ ब या मिळकतीत दाव्यात दिलेल्या वंशावळी व्यतिरीक्त अन्य बरेच हिस्सेदार असल्याने सदरची मिळकत दाव्यात सामील केलेली नाही' हा मजकूर दाव्यात नमूद नाही. सदर मजकूर दाव्यात नमूद करण्यास मला काही अडचण नव्हती.

०९. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.५ हिचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.५ ही माझी व माझा बंधू उमेश यांची आत्त्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.५ ही दावा मिळकती मधील घरात वास्तव्यास असते. माझ्या आजोबांचे नाव श्रीपत असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, श्रीपत यांनी प्रतिवादी क्र.५ हिला दावा मिळकती पैकी ६ गुंठे क्षेत्र घर बांधण्या करिता दिले होते. सदर घराचा घर क्रमांक जामसंडे नगरपंचायत घर क्र.१५७अ असा आहे अगर कसे याची मला माहिती नाही.

प्रश्न – प्रतिवादी क्र.५ हिचे घर व त्या खालील ६ गुंठे क्षेत्र वाटपावेळी प्रतिवादी क्र.५ हिला देण्यास तुमची काही हरकत आहे का ?
उत्तर – आम्ही त्यावेळी ठरवू.

१०. दावा मिळकती सोबत आमच्या कुटुंबाच्या अन्य किती मिळकती आहेत याची दावा दाखल करतेवेळी माहिती घेतली होती. दावा मिळकती व्यतिरीक्त आणखीन एक मिळकत आहे. त्याचा सर्वे नं.३२१ब असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नं.३२१/१ब ही देखील आमच्या कुटुंबाची अ विभक्त मिळकत आहे. मी त्या मिळकतीचा सातबारा पाहिला आहे. त्याचे अनेक हिस्से झाले आहेत. मला सर्वांची नावे सांगता येणार नाहीत. आता मला नि.क्र.२५ अ.क्र.१ येथे दाखल सातबारा उतारा दाखविण्यात आला. सदर सातबारा उताऱ्यास **नि.क्र.२६** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.२६ येथील सातबारा उताऱ्यामध्ये वादी व प्रतिवादी

यांच्या व्यतिरीक्त अन्य केवळ सहा खातेदार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यातील बरेचसे खातेदार हे जामसंडे, वळकूवाडी येथील रहिवासी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे नं.३२१ हिस्सा नं.१ब ही मिळकत हेतुत: दाव्यामध्ये समाविष्ट केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे  नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे  नाही की, आज मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI

Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2026.06.23 13:15:50 +0530

(श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

दि.२३/०६/२०२६